शनिवार, दि. ४ जानेवारी २०२५

# चंद्रपूर महासागर

पान ३

## बालाजी जिनींग अँड फेंसीग इंडस्ट्रीज मध्ये कापूस खरेदी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि.०३ जानेवारी :** तालुक्यातील मे. बालाजी जिनिंग अँड फ़ेसिंग इंडस्ट्रिज, रेंगाबोडी येथे सोमवार ३० डिसेंबर पासुन (कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडिया) सी सी आय च्या कापुस खरेदी ला सुरूवात करण्यात आलेली आहे. परिसरातील समस्त कापुस उत्पादक शेतकरी बांधवांनी शासकीय अनुदानाचा लाभ घेण्यासाठी व उत्तम भाव मिळावा म्हणुन कापुस विक्रीकरिता बालाजी जिनिंग रेंगाबोडी येथे आनण्याचे आवाहन संचालक श्रेयस लाखे, शतीस देवतळे, पक़ाश लाखे, शारदा लाखे, रोहीनी काटेखाये यांनी केलेले आहे.

## धान भरडधान्य सोयाबीन, मुग व उडिदच्या खरेदीसाठी मुदतवाढ

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि.०३ जानेवारी :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार सातत्याने शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी काम करत आले आहेत. त्यांच्या आणखी एका प्रयत्नाला राज्यव्यापी यश आलं आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांना सरकारने काही तासांतच प्रतिसाद दिला आणि धान/भरडधान्य तसेच सोयाबीन, मुग व उडिदच्या खरेदीसाठी मुदतवाढ दिली आहे. .राज्य सरकारने खरीप पणन हंगाम २०२४-२०२५ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान/भरडधान्य खरेदीसाठी ऑनलाईन पोर्टलवर शेतकरी नोंदणी करावी.

# अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या इसमांकडून १३ किलोग्रॅम गांजा जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ३ जानेवारी :** अवैध ड्रग्स, गांजा अशा अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या विरोधात धडक मोहीम चंद्रपूर पोलीसांच्या वतीने चालु आहे. त्याच मोहीमेच्या अनुषंगाने पोलीस अधिक्षक मुमक्का सुदर्शनयांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक महेश कोंडावार यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक स्थापन केले असून सदर पथकाच्या माध्यमातुन मोठ्या प्रमाणात अवैधरित्या गांजा विक्री करणाऱ्यांची माहिती काढून त्यावर कारवाई सुरू आहे.



दिनांक २ जानेवारी रोजी सकाळी १० वाजताचे सुमारास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गोपनिय माहिती मिळाली की, देवराम केसगिर, रा.खडकी, तालुका जिवती, हा इसम गांजा हा अंमली पदार्थ घेवून विक्रीकरीता मोटारसायकलने राजुरा येथे येणार आहे. सदर माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक रवाना होऊन पोलिस स्टेशन राजुरा हद्दीतील मौजा भेंडवी फाटा येथे देवराव माणिक केसगीर, वय ५० वर्ष, रा. पल्लेझरी, हल्ली मुक्काम शेणगाव ता. जिवती आणि दिनकर शंभु कुळसंगे, वय ५०, धंदा मजुरी, राहणार खडकी, तालुका जिवती या इसमांना पकडले. मोटार सायकलसह ताब्यात घेवून त्यांची झडती घेतली असता त्यांचेजवळ असलेल्या पोत्यामध्ये एकुण १३ किलोग्रॅम ८३५ गांजा किंमत १ लाख ९५ हजार रूपये, तसेच हिरो कंपनीची मोटारसायकल किंमत ५० हजार असा एकुण २ लाख ४५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर दोन्ही इसमांचे विरूद्ध कलम ८ (क), २१ (व) ग्ग (ब), २९ एन.डी.पी.एस. प्रमाणे पोलीस स्टेशन, राजुरा येथे गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींना पुढील तपासकामी पोलीस स्टेशन राजुरा यांचे ताब्यात देण्यात आले.

ही कामगिरी पोलीस अधिक्षक, चंद्रपुर, अपर पोलीस अधिक्षक, चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक महेश कोंडावार, शिवाजी कदम, पोलीस निरीक्षक, पोस्टे गडचांदुर यांचे नेतृत्वात सपोनि. दिपक कॉक्रेडवार, पोउपनि, विनोद भुरले, पोउपनि मधुकर सामलवार, पोहवा. किशोर वैरागडे, दिपक डोंगरे, नापोअं. संतोष येलपुलवार, पोशि. गोपाल आतकुलवार, गोपीनाथ नरोटे, दिनेश आराडे यांनी केली आहे.

# अभिजित बेहेते यांना रोटरीचा सर्वोत्कृष्ट रोटेरियन पुरस्कार



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ३ जानेवारी :** रोटरीचे माजी यशस्वी अधक्ष डॉ. महेश खानेकर यांच्या हस्ते व रोटरी क्लब चिमूर तर्फे कृषीमित्र रोटरियन अभिजित धनराज बेहेते यांना विवीध सामाजिक कार्याबदल सर्वोत्कृष्ठ रोटीयन पुरस्कार देवून गौरविन्यात आले. मागील वर्षी सामाजिक कार्य, विविध उपक्रम, सार्वजनिक जागरूकता, महिला सक्षमीकरण, मानवता, जैविक शेती जागरूकता, आणि समुदायांना बळकट करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल रोटरी क्लब चिमूर तर्फे गौरविण्यात आले. यावेळी उपस्थित रोटरीचे अधक्ष्य विशाल गंपावर, सचिव कैलास धनोरे, कोषाध्यक्ष्य पवन ताकसांडे, रोटे. वैभव लांडगे, रोटे. राकेश बघेल, रोटे. विलास अल्लडवार, रोटे. हरीश सारडा, रोटे. श्याम बंग, रोटे. दिनेश कठाने, रोटे. प्रफुल बेत्तावार, रोटे. पवन बंडे, रोटे. सुनील केमये, रोटे. विनोद भोयर, रोटे. राजेंद्र संगमवर, रोटे. खुशाब रोकडे, रोटे. मंगेश हिंगनकर, रोटे. आदित्य पिसे, रोटे. रुपेश अगडे, रोटे.अक्षय अवधूत, रोटे. अमर चट्टे व इतर सदस्य व असंख्य नागरिक यावेळी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांचे शैक्षणीक नुकसान टाळण्यासाठी शिक्षकांची नियुक्ती करा अन्यथा आंदोलन करु

## मेहा बु. येथील नागरिकांचा तहसीलदार, बिडीओला इशारा

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**सावली, दि. ३ जानेवारी :** जि.प.शाळेतील शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणीक नुकसान होत असल्याने नागरिकांनी त्वरीत शिक्षकांची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे.




सावली तालुक्यातील मेहा बुजरुक येथे इयत्ता ७ वी पर्यंत जिल्हा परिषद शाळा आहेत. यात ७ शिक्षक आणि १ मुख्याध्यापक यांची गरज आहे. मात्र मागील २ वर्षापासून फक्त ४ शिक्षक आणि १ मुख्याध्यापक कार्यरत आहेत. त्यामुळे एकाच वेळेस दोन अलग वर्गाला शिकवल्या जात आहेत. त्यामुळे यात गरीब आणि खेड्यातील विद्यार्थ्याचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे.

त्यामुळे त्यांना त्यांच्या शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे. त्याचा भविष्यात खूप मोठा फटका या गोष्टीमुळे शेकडो विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्याला बसेल. पालक हे गरीब असल्यामुळे ते त्यांना बाहेर शिक्षणासाठी पाठवू शकत नाही त्यामुळे त्यांच्या पुन्हा नुकसान होईल. त्यांच्या व्यक्तिमत्व विकास होणार नाही आणि त्यांचे भविष्य हे अंधारमय होईल.

त्यामुळे या विरोधात एक महिन्याच्या आता मेहा बुजरुक येथे ३ शिक्षक तसेच सावली तालुक्यात जिथे जिथे शिक्षक कमी आहेत अश्या सर्व ठिकाणी शिक्षक द्यावेत. अन्यथा न दिल्यास मोठा आंदोलन संपूर्ण सावली तालुक्यातून छेडण्यात येईल असा इशारा नागरिकांनी तहसीलदार तसेच बिडीओ यांना निवेदनातून दिला आहे.

निवेदन देताना जितू धात्रक, प्रकाश कोलते, नंदाजी पेंदाम, सरपंच रुपेशरामटेके, चिमणदास निकुरे, देवराव गेडाम, वामन कोरडे, किशोर गंडाटे, कांतेश बानबले, मदन निकुरे, सुभाष ढोलणे तसेच इतर महिला उपस्थित होत्या.

# हंसराज अहीर यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ३ जानेवारी :** राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची त्यांच्या लोककल्याण मार्गावरील शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेवून त्यांचेशी विविध विषयांवर चर्चा केली. राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या वतीने मागासवर्गीयांच्या हिताशी निगडीत कार्याची माहिती दिली.

दि. २ जानेवारी रोजी पंतप्रधान मोदीजी यांची भेट घेवून हंसराज अहीर यांनी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या माध्यमातून देशातील मागासवर्गीयांच्या (ओबीसी) हिताशी निगडीत होत असलेल्या कार्याबाबतही त्यांनी पंतप्रधानांना सविस्तर माहिती दिली. यावेळी अन्य बाबींवरही चर्चा करून पंतप्रधान महोदयांचे मार्गदर्शन घेतले.

## क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम

**चंद्रपूर, दि. ०३:** जागतिक दिव्यांग दिनाच्या औचित्याने जिल्हा समाज कल्याण कार्यालयातंर्गत जिल्ह्यातील दिव्यांगाच्या विशेष शाळा, कर्मशाळामध्ये शिक्षण घेत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याच्या दृष्टीने, शनिवार, दि. ४ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता, क्रीडा स्पर्धा तर सायकांळी ५.३० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा पोलीस मुख्यालय ग्रांउड, चंद्रपूर येथे करण्यात आले आहे.

# भद्रावती तालुक्यात पट्टेदार वाघांचा धुमाकुळ

## चारगावात चार म्हशी तर कचराळा येथे बकरी ठार केली

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ३ जानेवारी :** भद्रावती तालुक्यात सध्या पट्टेदार वाघाने धुमाकुळ घातला असून शेतातील शेत मजुराना काम करण्यास भीती निर्माण झाली आहे.



भद्रावती तालुक्यातील चारगाव येथे शेत शिवारात पट्टेदार वाघाने चार मशी ठार केल्या असून दुसरीकडे कचराडा येथे गावात घुसून एक बकरी ठार केल्याची घटना दिनांक ३ जानेवारी च्या मध्यरात्री घडली.

तालुक्यातील चारगाव येथील विकास धानकी यांच्या शेतशिवारात चराईसाठी सोडलेल्या म्हशीला पटेदार वाघाने हल्ला करून ठार केले. त्यात यांचे दोन लाख ४० हजाराचे नुकसान झाले आहे. त्यातच कचराळा येथे पट्टेदार वाघाने गावात घुसून गोठ्यात बांधलेली बकरी फस्त केल्याची घटना घडली. या घटनेची माहिती होताच वनविभागाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले. जनावराच्या मालकांनी नुकसान भरपाईची मागणी वन विभागाकडे केली आहे.

# राज्यस्तरीय 'दर्पणकार' पुरस्काराचे अतुल कोल्हे मानकरी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ३ जानेवारी :** अखिल भारतीय सक्षम टाइम्स मीडिया फाउंडेशन व सक्षम पोलीस टाइम्स यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी देण्यात येणारा राज्यस्तरीय 'दर्पणकार' पुरस्कार यावर्षी शहरातील पत्रकार अतुल कोल्हे यांना जाहीर करण्यात आला. सदर पुरस्काराचे प्रदान त्यांना नाशिक येथील वर्च्यु हॉल येथे ५ जानेवारीला आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार दिनाच्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. अतुल कोल्हे हे शहरात अनेक वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून आपल्या लेखणी द्वारे ते सामाजिक समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य अविरतपणे करीत आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे शहरात तसेच चंद्रपूर जिल्यात सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाला, ब्रम्हपुरी येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी केले रक्तदान

**महासागर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. ३ जानेवारी :** महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेटाळा महाविद्यालयात आज दि.३ जानेवारी २०२५ ला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.साकरकर, डॉ. बार सागडे, प्रो.महाजन, प्रो.डोईजड, प्रो.घुटके, प्रो.वसाके , प्रो.सोनवाणे, तसेच सर्व प्राध्यापक गण, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांना भावपूर्ण आदरांजली वाहिली.



या वेळेस महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत असंख्य विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.या कार्यक्रमानंतर महाराष्ट्र पोलीस स्थापना दिवसनिमित्य, ब्रम्हपुरी पोलीस स्टेशन द्वारा आयोजित रक्तदान शिबिरामध्ये तीस विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे संचालन बी.फॉर्म अंत्य ची विद्यार्थिनी फरहिन शेख यांनी व आभार प्रदर्शन रासेयो अधिकारी प्रो.श्रीकांत महाजन यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष देवेंदजी पिसे व प्राचाय.डॉ.सचिन दुधे यांनी अभिनंदन केले.

# ड्रिंक अँड ड्राईव्ह, गडचांदूर पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**भोयगाव, दि. ३ जानेवारी :** नववर्षाच्या पार्श्वभूमीवर गडचांदूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार शिवाजी कदम यांनी शहरात कडक बंदोबस्त ठेवून २९, ३० आणि विशेषतः ३१ डिसेंबर, या तीन दिवसात ९९ जणांवर कारवाई करून ३ लाख, १४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.नववर्षाच्या पूर्वसंध्येला शहरातील मुख्य मार्ग व इतर ठिकाणी पोलिसांनी नाकाबंदी केली.यामध्ये मद्यप्राशन करून वाहन चालवणे, भरधाव वेग तसेच ट्रिपल सीट दुचाकीस्वार व वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांचा समावेश आहे.



२९ डिसेंबर २०२४ रोजी मोवाका अन्वये २८ चालान ड्रिंक अँड ड्राईव्हसह एकूण दंड ७७ हजार ५०० वसूल करण्यात आला.यामध्ये कलम १२९/१९४(ॅ) हेल्मेट शिवाय मोसा चालविणे ७, कलम ३(१)/१८१ बिना लायसन्स १, कलम १९४(ॅ) सिटबेल्ट न वापरने १०, कलम १२२/१७७ वाहतुकीस अडथळा निर्माण करणे १, कलम १८५ ड्रंक अँड ड्राइव्ह ५, कलम १२८ (१)/१९४ᵐ ट्रिपल सीट ४, अशी कारवाई करण्यात आली.

३० डिसेंबर २०२४ रोजी मोवाका अन्वये ३२ चालना ड्रिंक अँड ड्राईव्हसह एकूण ७३ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.यामध्ये कलम १२९/१९४(ॅ) हेल्मेट शिवाय मोसा चालविणे ४, पिलीयन रायडर २, कलम १३०(१)/१७७ लायसन्स सादर न करणे १, कलम १९४(ॅ) सिटबेल्ट न वापरणे ७, कलम १२२/१७७ वाहतुकीला अडथळा निर्माण करणे ३, कलम १८५ ड्रंक अँड ड्राइव्ह ५, कलम २३९/ १७७ पोलिसांच्या इशाऱ्यचे पालन न करणे २, कलम १२८(१)/१९४ᵐ ट्रिपलसीट ८, अशी कारवाई करण्यात आली.

तसेच ३१ डिसेंबर २०२४ रोजी मोवाका अन्वये ३९ चालना ड्रिंक अँड ड्राईव्हसह १ लाख, ६३ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.यामध्ये कलम १२९/१९४(ॅ) हेल्मेट शिवाय मोसा चालविणे १, कलम १३०(१)/१७७ लायसन्स सादर न करणे १, कलम १९४(ॅ) सिटबेल्ट न वापरणे १२, कलम १२२/१७७ वाहतुकीला अडथळा निर्माण करणे ३, कलम १८५ ड्रंक अँड ड्राईव्ह १४, कलम २३९ /१७७ पोलिसांच्या इशाऱ्यचे पालन न करणे १, कलम १२८(१)/१९४ᵐ ट्रिपलसीट ५, कलम २०२/१७७ मालाची असुरक्षिता १, कलम ११९ प्रेस हॉर्न १, अशाप्रकारे २९, ३० आणि ३१ डिसेंबर, या तीन दिवसात ९९ जणांवर कारवाई करून पोलिसांनी ३ लाख, १४ हजारांचा दंड वसूल केला आहे.सदरची कारवाई ठाणेदार शिवाजी कदम यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखा व समस्त पोलिसांनी केली आहे.

## 'ठाणेदाराचे नागरिकांना आवाहन.'

सदरची कारवाई केवळ नवीन वर्षाच्या निमित्ताने नव्हती, अशाप्रकारे सतत कारवाई सुरू राहणार असून दुचाकी-चारचाकी वाहने चालवताना सीटबेल्ट, हेल्मेटचा वापर करवा, दारू पिऊन बेशिस्तपणे वाहने रस्त्यावर चालवू नये, वाहतुक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे आवाहन ठाणेदार शिवाजी कदम यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग, नागभीड

Website-www.mahapwd.gov.in

विभागाचे नांव : सार्वजनिक बांधकाम विभाग, नागभीड

ई – निविदा मागविणारी सुचना : ई–निविद सुचना क्र.३४/मसस/२०२४–२०२५ (चंद्रपूर जिल्हयातील मजूर सहकारी संस्थांकरीता राखीव)

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नागभीड हे खालील कामांकरीता कंत्राटदाराकडून ब–१ निविदा प्रपत्रामध्ये ई निविदा आमंत्रित करीत आहे.

कामाचे संक्षीप्त वर्णन

[redacted]

| | | अंदाजित किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|
| [redacted] | | |
| ३ | Compound wall and Renovation of Surrounding of Center Administrative Carropis Sindewahi Taluka Sindewahi District Chandrapur | ३०.०० |
| ४ | ब्रम्हपूरी तालुक्यातील चौगांन येथे श्री मधुकर पेंद ते कार्तीक नन्नवरे यांचे प्लॉट पर्यंत सिमेंट कॉक्रिट रोडचे बांधकाम करणे | २५.०० |
| ५ | सावली तालुक्यातील मोखाळा येथे रेमाजी जुनघरे ते गांधी चौक पर्यंत बंदीस्त नालीचे बांधकाम करणे | २५.०० |
| ६ | सिंदेवाही तालुक्यातील नविन जामसाळो ते घासेरा नाला रस्त्याचे बांधकाम करणे | २५.०० |
| ७ | मौजा तपरी येथे राईबाई बावनखेडे ते माणिक भोयर व पुरुषोत्तम जुआरे ते मेन रोड पर्यत समेट कॉकिट रस्त्याचे व नालीचे बांधकाम करणे | २०.०० |
| ८ | सावली तालुक्यातील कापसी येथे संताजी नगर येथे सुरेश भांडेकर ते बाबुराव बारसागडे यांचे घरा पर्यंत सिमेंट कॉकिट रस्ता व नालीचे बांधकाम करणे | २०.०० |
| ९ | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही तालुक्यातील मौजा जामशाळा जुना येथे मानकादेवी परिसरात शासकीय जागेत सभागृहाचे बांधकाम करणे | १५.०० |
| १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही तालुक्यातील मौजा मुरपार तुकुम येथे दलित वस्ती मध्ये शासकिय जागेत समाज मंदीर बांधकाम करणे | १५.०० |
| ११ | ब्रम्हपूरी तालुक्यातील मौजा वायगांव येथे दलीत वस्ती मध्ये शासकीय जागेत समाज मंदीर बांधकाम करणे | १५.०० |
| १२ | सावली तालुक्यातील हिरापूर येथे गाव अंतर्गत सिमेंट नालीचे बांधकाम करणे | १५.०० |
| १३ | ब्रम्हपूरी तालुक्यातील चौगान येथे चंद्रभान बांगरे ते शेतकी शाळेपर्यंत नालीचे बांधकाम करणे | १५.०० |
| १४ | सावली तालुक्यातील गायडोंगरी येथे पत्रुजी जराते ते हनुमान मदीर पर्यत समेट कॉकिट रस्त्याचे बांधकाम करणे | १५.०० |
| १५ | सावली तालुक्यातील मौजा साखरी येथे अनंत नैताम ते लक्ष्मण टेकाम यांचे घरापर्यत सिमेंट कॉक्रिट नालीचे बांधकाम करणे. | १५.०० |
| १६ | सावली तालुक्यातील कडोली येथे डोमाजी चलाख ते बंडू शेंडे ते राजू शेंडे यांचे घरापर्यत सिमेंट कॉक्रिट रस्त्याचे बांधकाम करणे | १५.०० |
| १७ | सावली तालुक्यातील सोनापूर येथे बेंधर कात्री ते कालीदास सुरपाम यांचे घरापर्यन्त सिमेंट कॉक्रिट रस्त्याचे बांधकाम करने. | १५.०० |
| १८ | मौजा खेडी येथे तुळशीराम मडावी ते शामराव मरस्कोल्हे यांचे घरापर्यत समेट कॉकिट रस्त्याचे व नालीचे बांधकाम करणे | १३.०० |
| १९ | गावली तालुक्यानील चांदली बुज येथे रेवताबाई आकुलवार ते विरा मिडपलवार यांचे घरा पर्यत सिमेंट कॉक्रिट रस्ता व नालीचे बांधकाम करणे | १२.०० |

| | | |
|---|---|---|
| १ | ई–निविदा उपलब्ध कालावधी | ऑनलाईन वेळापत्रकानुसार |
| २ | ई–निविदा उघडणे | ऑनलाईन वेळापत्रकानुसार |

निविदेच्या अटी व शर्ती

१. वरील कामाच्या ई–निविदा प्रपत्रा मध्ये नमुद वेळापत्रकानुसार ई–निविदा डाऊनलोड न पिपरेशन करता येईल.
२. निविदा कागदपत्रांचा तपशील **https://mahatenders.gov.in** निविदा संकेत स्थळावर उपलब्ध आहे. निविदाकारानी खात्री करुन घ्यावी, व ई–पेमेंट गेटवे सुविधेनुसार निविदेचे शुल्क आणि बयाना रक्कम ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.
३. निविदाकारांनी त्यांच्या बोली ऑनलाईन/इलेक्ट्रॉनिक पध्दतीने सादर करावेत.
४. निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारांनी क्लास III डिजिटल सिग्नेचर आणि वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध आहे. **https://mahatenders.gov.in** ई–निविदा करीता स्वताचे नाव नोंदणी करुन घ्यावी.
५. वरिल कामाची ई–निविदा सुचना सा. बां. विभागाच्या **www.mahapwd.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
६. ऑनलाईन वेळापत्रक लागू राहील व अंतीम राहील.
७. पत्र व्यवहाराकरीता संपर्क पत्ता

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नागभीड

जावक क्र.९६२/चंद्र/निविदा/२०२४ दिनांक २३–१२–२०२४
कार्यालय कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, नागभीड
दुरध्वणी क्र. ०७१७९–२४००६६
ईमेल पत्ता Enagbhid.ce@mahapwd.gov.in

(जया ठाकरे)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग
नागभीड

DGIPR - 2024-25/No-5/C5448

